“आचार्य बाळशास्त्री जाभेंकर सन्मान योजना”
करिता पूरक मागणीव्दारे मंजूर झालेला रुपये १० कोटी इतका निधी आहरित करण्यास शासन मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. पूरक-२०२१/प्र.क्र.१४३/कार्या-३४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०१ फेब्रुवारी, २०२२

वाचा :- १) माहिती जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र.वृत्त (२०२१)/सन्मान योजना-पूरक निधी वितरण/का-२/४२, दिनांक २४ जानेवारी,२०२२.
२) माहिती जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र.वृत्त (२०२१)/सन्मान योजना/का-२/२५६, दिनांक २१ जून,२०२१.

प्रस्तावना:-

पत्रकारांना निवृत्तीवेतन देण्यासंदर्भातील मागणी, विविध पत्रकार संघटना, लोकप्रतिनिधी, विधानमंडळ संदस्य यांच्याकडून शासनाकडे वांरवार करण्यात येत होती. प्रसिध्दी माध्यमे हा भारतीय लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. राज्य शासन सर्वसामान्य नागरीकांसाठी ज्या लोकोपयोगी योजना जाहिर करते, त्याची व्यापक प्रचार व प्रसिध्दीचे कामकाज, माध्यमे व त्यामध्ये काम करणारे पत्रकार निरपेक्ष भावनेने करीत असतात. त्यामुळे राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांप्रती आदरभाव, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांना आर्थिक सहाय्य देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

पत्रकारांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या, “शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी या योजने” च्या विश्वस्त मंडळामार्फत ज्येष्ठ पत्रकारांसाठी, आचार्य बाळशास्त्री जाभेंकर सन्मान योजना” राबविण्यास शासन निर्णय दिनांक ०२ फेब्रुवारी,२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत पुरक मागणीव्दारे मंजूर झालेला रुपये १० कोटी इतका निधी BDS वर वित्त विभागाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभाग, मागणी क्र.ए-६, २२२०-माहिती व प्रसिध्दी, ०१-चित्रपट,००१-संचालन व प्रशासन (००)(०१), प्रसिध्दी संचालक (२२२० ००४३) ३१-सहायक अनुदान या लेखाशिर्षाखाली

उपलब्ध करुन देण्यात आलेल्या रुपये १० कोटी निधी आहरित करुन सदर निधीचा विनियोग करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२०२०११६५२०३३८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

AVINDRA BHIKAJI MORYE

Digitally signed by AVINDRA BHIKAJI MORYE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=01344b08f37ac02e8488c61c468208e8d69a843917e75fef289 3df71ccab0faf, pseudonym=32A2EAE514431321A37494EC2A2ADF914E132F7C, serialNumber=66EC84B6738FF47B21428AD5C3E86ED22C64FDE22957 E48F885E1AB329C2660E, cn=AVINDRA BHIKAJI MORYE
Date: 2022.02.01 16:55:05 +05'30'

(अ. भि. मोरये)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.राज्यमंत्री (सा.प्र.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
६) सर्व संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
७) महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), नागपूर/मुंबई.
८) उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
११) लेखाधिकारी (आहरण व संवितरण), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई.
१२) कार्यासन व्यय - ४, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
१३) कार्यासन -२५, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
१४) निवडनस्ती (का.३४), सामान्य प्रशासन विभाग. मंत्रालय, मुंबई - ४०००३२.